action edn 110


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

MCAER
कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२२३-४/१६०६/२०२३ दि.१५/०६/२०२३

**संदर्भ:-** १. कुलसचिव, वनामकृवि, यांचे पत्र क्र. काप-२०९/कृपबैठक-११०, दि.१४/०३/२०२३

२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.मकृप/शिक्षण-१/६२३-ब/१०८७, दि.१८/०४/२०२३.

३. कुलसचिव, वनामकृवि, यांचे पत्र जा. क्र. काविअम/विद्याशाखा बदल / विद्या-३/२०६४, दि. ११/०५/२०२३.

४. कुलसचिव, वनामकृवि, यांचे पत्र जा. क्र. २०२३/काविअम/विद्याशाखा बदल/ विद्या-३, दि. १३/०६/२०२३.

-----------------------------------

## आदेश

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत, श्री. धनेश्वरी मानव विकास मंडळ संचलित कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली या महाविद्यालयाचे रुपांतर कृषि महाविद्यालयांमध्ये करण्याबाबत कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी मान्यता प्रदान केली आहे. या प्रकरणी कृषि परिषदेच्या दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या ११० व्या बैठकीमध्ये विषय सादर करण्यात आला असता, खालील ठराव पारित करण्यात आला आहे.

<u>ठराव क्र.०५/११०/दि.२९/०५/२०२३</u>

**‘‘वनामकृवि, परभणी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या आधारे माऊली शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अन्नतंत्र महाविद्यालय, लोणी, ता.उदगीर, जि. लातूर आणि श्री. धनेश्वरी मानवविकास मंडळ संचलित कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली हया महाविद्यालयांचे रूपांतर कृषी महाविद्यालय (कृषी पदवी) मध्ये करण्यास त्रुटी पूर्ततेच्या अधीन राहून कृषी परिषद मान्यता प्रदान करते. तसेच वनामकृवि, परभणी या कृषी विद्यापीठाकडून त्रुटी पूर्ततेबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरील महाविद्यालयाचा प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्यात यावा असेही कृषी परिषद निर्देश देते.’’**

यास्तव, श्री. धनेश्वरी मानव विकास मंडळ संचलित कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली या महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून रद्द करण्यात येत असून सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून सदर महाविद्यालयाचे

action edn 110

रुपांतर त्रुटी पूर्ततेच्या अधीन राहून कृषि महाविद्यालय, हट्टा, ता.वसमत, जि. हिंगोली (प्रवेश क्षमता ६० विद्यार्थी प्रति वर्ष) या महाविद्यालयामध्ये करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

या महाविद्यालयास स्थानिक मूल्यांकन समितीने दर्शविलेल्या त्रुटी आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशीनुसार शिक्षकवर्गीय कर्मचारी तसेच इतर वाढीव सुविधांची पूर्तता करण्याच्या अधिन राहून तसेच, कृषि परिषदेच्या ७५ व्या बैठकीतील ठराव क्रमांक १९/७५/२००८ ठरावानुसार रुपांतरीत केलेल्या महाविद्यालयामध्ये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापर्यंत प्रवेशित विद्यार्थ्यांना नजिकच्या महाविद्यालयात सामावून घेण्याची कार्यवाही वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि संबंधित संस्था यांच्या समन्वयाने किंवा कृषि विद्यापीठाने संबंधित संस्थेस प्रवेशित विद्यार्थ्यांची पुढील शैक्षणिक जबाबदारी घेण्यासाठी सूचित करावे.

याबाबत, कुलसचिव, वनामकृवि, परभणी यांना सूचित करण्यात येते की, उक्त रुपांतरित कृषि महाविद्यालयाच्या त्रुटी पूर्ततेच्या अहवालासोबत सदर महाविद्यालयाचे सन २०२३-२४ च्या पदवी प्रवेश प्रक्रियेविषयक 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करावे.

**मा.महासंचालक**
**यांच्या मान्यतेने.** }

15/6/2023

**(उत्तम कदम)**
**संचालक (शिक्षण)**

**प्रति,**

**कुलसचिव,**
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ,
परभणी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी:-**

१. अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी.
२. अध्यक्ष श्री. धनेश्वरी मानवविकास मंडळ, बी-१०१, तुलसी आर्केड, कॅनॉट गार्डन, सिडको, औरंगाबाद.
३. प्राचार्य, कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली.
४. प्राचार्य, कृषि महाविद्यालय, हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली. (रुपांतरीत महाविद्यालय)

**प्रत माहितीस्तव:**

मा. मंत्री (कृषि) तथा अध्यक्ष कृषि परिषद यांचे खाजगी सचिव. मा. मंत्री (कृषि) यांचे कार्यालय, मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.